—: प्रेसनोट :— दि. ०५/०३/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ११/२०२१ |
| कलम | कलम ७ भ्र.प्र.अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | बापु तानाजी चोरगे, वय ५४ वर्षे, धंदा—नोकरी, कनिष्ठ लिपीक, सेंट्रल डेअरी, आरे गोरेगांव, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १५,०००/— व दारूचा खंबा |
| तडजोडीअंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम | रू. १५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १५,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे पवई आय.आय.टी गेट समोर आरे दुध सेंटर चालवितात. दि.०१/११/२०२० रोजी फिर्यादी हे नेहमीप्रमाणे दुध सेंटर वर असताना डेअरी अधिकारी श्री.बोरसे व त्यांचेसोबत आणखी एक इसम असे दोघेजण त्यांचे दुध सेंटर वर आले व त्यांनी फिर्यादी यांना " दुध सेंटर मधील फ्रिज बंद आहे व दुध सेंटरच्या बाबतीत तक्रारी आहेत".असे सांगुन दुध सेंटरच्या बाहेर फिर्यादी यांना काढून त्यांचे दुध सेंटर सीलबंद केले व निघुन गेले.<br>दि.०२/११/२०२० रोजी फिर्यादी हे आरे सेंटर गोरेगाव येथील कार्यालयातील डेअरी अधिकारी श्री बोरसे यांना भेटले असता, त्यांनी डेअरी मॅनेजर श्री जी.एन. राऊत व श्री.बापू चोरगे यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी हे श्री.राऊत व श्री.चोरगे यांना भेटले. त्यावेळी फिर्यादी यांना लोकसेवक यांनी आज—उद्या असे करत त्यांचे दुध सेंटर उघडून दिले नाही.<br>फेब्रुवारी २०२१ मध्ये फिर्यादी हे लोकसेवक श्री. बापू चोरगे यांना भेटले असता, त्यांनी फिर्यादी यांचेकडे रू.१०,०००/— लाचेची मागणी केली व त्यानंतर दुध सेंटर उघडून देतो असे सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी लोकसेवक चोरगे यांना रू. १०,०००/— दिले. परंतु पैसे देवुनही लोकसेवक यांनी फिर्यादी यांचे दुध सेंटर त्यांना उघडून दिले नाही. त्यामुळे फिर्यादी हे दि.०२/०३/२०२१ रोजी लोकसेवक बापू चोरगे यांना सेंट्रल डेअरी, आरे येथे जावून भेटले असता, श्री.चोरगे यांनी फिर्यादी यांना रू. १५,०००/— व एक दारूचा खंबा घेवून दि.०५/०३/२०२१ रोजी भेटण्यास या" असे सांगितले. परंतू फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि.०३/०५/२०२१ रोजी लेखी तक्रार अर्ज दिला होता.<br>फिर्यादी यांनीं दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०५.०३.२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी रु. १५,०००/— व दारूचा खंबा अशी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे रचण्यात आलेल्या सापळा कारवाईच्या वेळी लोकसेवक बापु तानाजी चोरगे यांना फिर्यादी यांचेकडुन रू.१५,०००/— लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. आलोसे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचेवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ३०.
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक- www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप- www.acbmaharashtra.net
व्हॉट्सॲपक्रमांक—९९३०९९७७००

5/3/2021
(वैशाली गोरडे )
सहा पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.